# शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांचे कार्यालय पुणे -१

१७ डॉ. आंबेडकर रोड, लाल देवळाजवळ पुणे-१

दुरध्वनी क्रमांक ०२०- २६१२२२१७ फॅक्स क- ०२०- २६१२२२१७

ई-मेल आयडी- dydpune@gmail.com वेब साईट- WWW.dydepune.com


महत्त्वाचे

जा.क्र.शिउसं/उमाशि-३/११ वी/पुवि/२०१६/e

दिनांक :- 8 JUN 2016

प्रति,

प्राचार्य,
सर्व कनिष्ठ महाविद्यालये,
पुणे.

**विषय:** व्यवसाय शिक्षण NSQF लेव्हल २ - इयत्ता १० वी अंतर्गत मल्टी स्किल (subject code 81), रिटेल (subject code 83) व ऑटो (subject code 82) पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना इयत्ता ११ वी व १२ वी च्या विषय योजने प्रमाणे कला, विज्ञान किंव्वा वाणिज्य शाखेच्या ४ वैकल्पिक विषयापैकी एक NSQF अंतर्गत व्यवसाय शिक्षणाचा विषय निवडण्यास परवानगी देणे बाबत.

संदर्भ :१. राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियाना या कार्यालयाचे दिनांक ३० मे २०१६ चे पत्र (रामाशिअ/व्य.शि./(८२/१६)/२०१६/५१३

२. राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियाना या कार्यालयाचे दिनांक २ जून चे पत्र (रामाशिअ/व्य.शि./(६७/१६)/२०१६/५२४

३. शासन निर्णय क्रमांक: न्यायाप्र-२०१५/ (६१/१५) एसडी -२ दिनांक २८ मार्च २०१६.

राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान अंतर्गत NSQF आधरित व्यवसाय शिक्षण माध्यमिक स्तर या योजनेमध्ये राज्यात सन २०१४-१५ पासुन व्यवसाय विषय माध्यमिक व उच्चमाध्यमिक स्तरांवर सुरु करण्यास केंद्र शासनाने परवानगी दिलेली आहे. त्या नुसार राज्यात सन २०१५-१६ पासुन या योजनेच्या अंमलबजावणीस सुरवात झालेली आहे संदर्भ -१ नुसार पुणे महानगरपालिकेच्या ५ उच्च माध्यमिक शाळामध्ये NSQF नुसार मल्टी स्किल व रिटेल हे व्यवसाय शिक्षणचे विषय इयत्ता ११ वी १२ वी करिता लेव्हल ३ व ४ सुरु करण्यास मान्यता तसेच संदर्भ -२ नुसार व्यवसाय शिक्षण लेव्हल २ इयत्ता १० वी NSQF अंतर्गत मल्टी स्किल,रिटेल व ऑटो पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना इयत्ता ११ वी व १२ वी च्या विषय योजने प्रमाणे ४ वैकल्पिक विषयापैकी एक व्यवसाय शिक्षणाचा विषय निवडता येईल.

संदर्भ ३ नुसार National Skill Qualification Framework वर आधारित सुरु करण्यात आलेले व्यवसाय शिक्षण लेव्हल ३ निवडणाऱ्या विध्यर्थ्यांना ऑनलाईन पद्धतीने कला, विज्ञान किंव्वा वाणिज्य शाखेमध्ये महाविद्यालयात प्रवेशा करिता अर्ज करता येणार आहे. तथापि त्याला व्यवसाय शिक्षण लेव्हल ३ हा विषय पुणे महानगरपालिकेच्या ५ माध्यमिक शाळामध्ये NSQF नुसार मल्टी स्किल व रिटेल हे व्यवसाय शिक्षणचे विषय इयत्ता ११ वी १२ वी करिता लेव्हल ३ व ४ सुरु करण्यास मान्यता असलेल्या माध्यमिक शाळेतुन शिकण्याची मुभा राहणार आहे.

सन २०१४ -१५ मध्ये तत्कलीन मा.सचिव शालेय शिक्षण यांच्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार राज्यातील पुणे महानगरपालिकेच्या ८ शाळामध्ये मल्टी स्किल व रिटेल हे विषय व राज्यातील अन्य १७ शाळेमध्ये ऑटो हा विषय संचालक, व्यवसाय शिक्षण यांचे सहकार्याने सुरु करण्यात आला आहे. हे विषय घेउन या शाळेतील विद्यार्थी मार्च २०१६ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता १० वी च्या परीक्षेस प्रविष्ठ झाले आहेत. संदर्भ २ नुसार या विद्यार्थ्यांना आपले व्यवसाय शिक्षण पुढे सुरु ठेवता यावे याकरता Level-3 आणि Level-4 (इयत्ता ११ वी आणि १२ वी) चे व्यवसाय शिक्षण इयत्ता ११ वी व १२ वी च्या विषय योजने प्रमाणे ४ वैकल्पिक विषयापैकी एक व्यवसाय शिक्षणाचा विषय निवडण्यास परवानगी देण्यात आली आहे.

National Skill Qualification Framework वर आधारित राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियाना अंतर्गत सुरु करण्यात आलेले व्यवसाय शिक्षण लेव्हल ३ निवडणाऱ्या विध्यर्थ्यांना ऑनलाईन पद्धतीने कला, विज्ञान किंव्वा वाणिज्य शाखेमध्ये महाविद्यालयात प्रवेशा करिता अर्ज करता येणार आहे. जरी ह्या विद्यार्थ्यांनी आपल्या महाविद्यालयात ११ साठी प्रविष्ठीत झाले असले तरी, व्यवसाय शिक्षण लेव्हल ३ हा विषय पुणे महानगरपालिकेच्या ५ माध्यमिक शाळामध्ये NSQF नुसार व्यवसाय शिक्षणचे विषय इयत्ता ११ वी १२ वी करिता (लेव्हल ३ व ४) सुरु करण्यास मान्यता असलेल्या माध्यमिक शाळेतुन शिकण्याची मुभा राहणार आहे.

संदर्भ ३ प्रमाणे, जे विद्यार्थी आपल्या महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतील त्या विद्यार्थ्यांना कला, विज्ञान किंव्वा वाणिज्य शाखेमधील ४ वैकल्पिक विषयापैकी एक NSQF आधरित व्यवसाय शिक्षणाचा विषय निवडता येईल. हे विद्यार्थी तो व्यवसाय विषय पुणे महानगरपालिकेच्या खालील उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये शिकतील व उर्वरित ५ विषय आपल्या महाविद्यालयात शिकतील. मल्टी स्किल व रिटेल हे दोन NSQF आधरित व्यवसाय शिक्षणाचे विषय (लेव्हल ३) पुणे महानगरपालिकेच्या खालील ५ माध्यमिक शाळामध्ये राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान अंतर्गत सुरु करण्यात आले आहेत.

| अ. क्र. | शाळेचे नाव |
|---|---|
| १ | नेताजी सुभाषचंद्र बोस माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, नवी खडकी, येरवडा पुणे ४११००६ |
| २ | यशवंतराव चव्हाण माध्यमिक विद्यालय, बिबवेवाडी सिटी बसस्टॉपच्या मागे, भगली हॉस्पिटल रोड बिबवेवाडी, पुणे ४११०३७ |
| ३ | बाबूरावजी सणस कन्या शाळा, मंगळवार पेठ४११०११, पुणे |
| ४ | सावित्रीबाई फुले, प्रशाला, भवानी पेठ, पुणे ४११०२ |
| ५ | हुतात्मा बालवीर शिरीषकुमार माध्यमिक विद्यालय, पोलीस लाईन, पोलीस मुख्यालयासमोर, शिवाजीनगर, पुणे ४११००५ |

MRaut 8.6.16

(मिनाक्षी राऊत)
सचिव
इ.११ वी केंद्रीय प्रवेश नियंत्रण समिती
तथा
सहा.शिक्षण संचालक
पुणे विभाग पुणे-१

**प्रत माहितीसाठी सविनय सादर.**

१) मा. आयुक्त(शिक्षण) म.रा. पुणे

२) मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) म.रा.पुणे